**रेग्यु. क्रि. केस नं. ११०/२०२०**

**निशाणी – ४८**

<u>**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक – ०१ मी शपथपूर्वक सांगतो कि –**</u>

**माझे नाव –** नितीन गणपती मोहिते

**वय** – ३१, **व्यवसाय**– शेती

**राहणार**– तोंडोली, ता. कडेगांव जि. सांगली.

<u>**सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकिल श्री.वाय.जे.चन्ने यांचे मार्फत साक्षीदारचा सरतपास शपथेवर –**</u>

१. दिनांक २०/०६/२०२० रोजी पोलीसांनी मला सासपडे गावात पंचनामा करणेकरीता बोलावले होते. घटनास्थळ विजय मोहिते यांनी दाखविले. घटनास्थळी विलास माने यांचे घर होते. घटनास्थळी रस्त्याच्या गवतामध्ये चार कळकाच्या काठ्या पडलेल्या होत्या. विजय मोहिते यांनी त्या काठ्या दाखविल्या. पोलीसांनी त्या काठ्या जप्त केल्या. घटनास्थळी पुर्व–पश्चिम डांबरी रस्ता आहे. पश्चिम बाजुला सासपडे गावची कमान आहे. दक्षिणेला मोकळी जागा आहे. पंचनामा सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत करणेत आला. मला आता पंचनामा दाखविला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. पंचनाम्याला <u>**निशाणी ४९**</u> देण्यात येते.

२. घटनास्थळावरुन जप्त केलेल्या काठ्या दाखविल्यास मी ओळखू शकतो. (साक्षीदारास न्यायलायात जमा असलेल्या मुद्देमाल नं.४२/२१ मधील काठ्या दाखविल्या.) त्या काठ्या घटनास्थळावरुन जप्त केलेल्या असल्याचे साक्षीदाराने सांगितले. चारही काठ्यांना एकत्रितरित्या <u>**वस्तु अ**</u> देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

<u>**आरोपींतर्फे वकिल श्री. एस.एल.पवार यांचे मार्फत उलटतपास शपथेवर –**</u>

३. हे खरे की, घटनास्थळ हा रहदारीचा रस्ता आहे. हे खरे की, घटनास्थळाच्या पश्चिमेचा रस्ता देखील रहदारीचा आहे. हे खरे की, घटनास्थळ ही रस्त्यावरील मोकळी जागा आहे.

उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

दि. १२/०६/२०२३ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव.